## प्रतिनिधी निवास व्यवस्था :

मराठी अर्थशास्त्र परिषदेकरिता बाहेर गावावरून येणाऱ्या प्रतिनिधींची निवास व्यवस्था वाघीरे महाविद्यालय, मुलींचे वसतीगृहामध्ये करण्यात आली आहे.

## अधिवेशनासाठी संपर्क :

| | |
|---|---|
| डॉ. विशाल पावसे (स्थानिक कार्यवाह) | - ९८९०१७६४७८ |
| डॉ. किशोर लिपारे (निवास व्यवस्था) | - ७२७६४८१२२७ |
| प्रा. अनिल झोळ | - ९८८१४४४६४९ |
| डॉ. सुजाता निकम | - ९७३००२५७९९ |
| प्रा. सुनिता कोलते | - ९९२२१३८६७४ |
| प्रा. समीर कुंभारकर | - ८८८८७८८४०९ |

## कार्यकारी मंडळ :

| | |
|---|---|
| प्रोफेसर डॉ.दिलीप सोपानराव अर्जुने | - अध्यक्ष |
| डॉ. अविनाश रामलाल निकम | - कार्याध्यक्ष |
| डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे | - कार्यवाह-खजिनदार |
| डॉ. राहूल शंकरराव म्होपरे | - संपादक,अर्थसंवाद |
| डॉ. अजय रामकिसन दरेकर | - विश्वस्त |
| डॉ. विकास विनायक सुकाळे | - विश्वस्त |
| डॉ. घिनमिने विठ्ठल माणिकराव | - विश्वस्त |
| डॉ. जितेंद्र दगडू तलवारे | - सदस्य |
| डॉ. दयालू किसन राठोड | - सदस्य |
| डॉ. सावंत सुभाष संपतराव | - सदस्य |
| डॉ. मनीषकुमार काशीनाथ कायरकर | - सदस्य |
| डॉ. राजाराम केरबा पाटील | - सदस्य |
| डॉ. सुरेश एकनाथराव घुमटकर | - सदस्य |
| डॉ. सुरेश भास्कर ढाके | - सदस्य |
| प्राचार्य डॉ. संजय पंडितराव धनवटे | - सदस्य |
| डॉ. विजय नागोराव भोपाळे | - सदस्य |
| डॉ. इंगळे जयवंत | - सदस्य |
| डॉ. बाळासाहेब साहेबराव पाटील | - सदस्य |
| डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे | - स्वीकृत सदस्य |
| डॉ. जनार्धन माधव काकडे | - स्वीकृत सदस्य |
| डॉ. विशाल भाऊसाहेब पावसे | - स्थानिक कार्यवाह |

निमंत्रित सदस्य : समस्त माजी अध्यक्ष

# कार्यक्रम पत्रिका

### शनिवार, दि. २५ नोव्हेंबर २०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० | - प्रतिनिधी नोंदणी व अल्पोपहार |
| सकाळी १०.३० ते १.०० | - उद्घाटन समारंभ |
| | - प्रास्ताविक |
| | - कार्यवाह खजिनदार यांचे मनोगत |
| | - कार्याध्यक्षांचे मनोगत |
| | - प्रमुख अतिथींचे भाषण |
| | - अध्यक्षीय मनोगत<br>प्रोफेसर प्रा.डॉ.दिलीप अर्जुने<br>अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद |
| दुपारी १.०० ते २.३० | - भोजन अवकाश |
| दुपारी २.३० ते ४.३० | - चर्चासत्र पहिले |

विषय : मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण

| | |
|---|---|
| सायं. ०५.०० ते ६.३० | - प्रा.नी.वि.सोवनी स्मृती व्याख्यान |
| रात्री ०७.३० ते ८.०० | - सांस्कृतिक कार्यक्रम |

### रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३

सकाळी ०८.०० ते १०.०० - अल्पोपहार

सकाळी ०९.३० ते १२.३० - चर्चासत्र दुसरे

विषय - केंद्र पुरस्कृत विकासयोजना आणि भारतीय शेती.

| | |
|---|---|
| दुपारी १२.३० ते २.०० | - भोजन अवकाश |
| दुपारी २.०० ते ४.०० | - चर्चासत्र तिसरे |

विषय : महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र

दुपारी ४.३० ते ६.०० - चर्चासत्र चौथे (ऐनवेळचा विषय)

विषय - भारतातील आधारभूत संरचनेचे मूल्यमापन

| | |
|---|---|
| रात्री ७.३० ते ८.०० | - सांस्कृतिक कार्यक्रम |
| रात्री ८.०० ते १०.०० | - भोजन व विश्रांती |

### सोमवार, दि. २७ नोव्हेंबर २०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते ९.०० | - अल्पोपहार |
| सकाळी ९.३० ते ११.०० | - माजी अध्यक्ष ह.कृ.परांजपे<br>स्मृति व्याख्यान |
| सकाळी ११.०० ते १२.३० | - समारोप समारंभ |
| दुपारी १२.३० ते २.०० | - सर्वसाधारण सभा |
| दुपारी २.०० ते ३.०० | - भोजन |
| दुपारी ३.०० ते ४.०० | - प्रमाणपत्र वितरण |

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

## वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

**सासवड**

ता. पुरंदर, जि. पुणे

# मराठी अर्थशास्त्र परिषद

**४६ वे राष्ट्रीय अधिवेशन नोव्हेंबर २०२३**

दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३



## मा. अजितदादा पवार

उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य

अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे

**मा.राजेंद्र घाडगे** - उपाध्यक्ष, पु.जि.शि.मं.,पुणे

**ॲड.संदिप कदम** - मानद सचिव, पु.जि.शि.मं.,पुणे

**ॲड.मोहनराव देशमुख** - खजिनदार, पु.जि.शि.मं.,पुणे

**मा.एल.एम.पवार** - उपसचिव, पु.जि.शि.मं.,पुणे

**मा.ए.एम.जाधव** - सहसचिव प्रशासन, पु.जि.शि.मं.,पुणे

**प्रोफेसर डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने**

अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

### आपले विनीत

| | |
|---|---|
| **प्रा. डॉ. विलास वाणी**<br>समन्वयक, संगणकशास्त्र | **प्रा. शिवाजी भुजबळ**<br>समन्वयक, विज्ञान विभाग |
| **प्रा. डॉ. संपत जगदाळे**<br>उपप्राचार्य | **डॉ. सुभाष वाव्हळ**<br>उपप्राचार्य |
| **प्रा. डॉ. संजय झगडे**<br>आय. क्यू. ए.सी समन्वयक | **डॉ. विशाल पावसे**<br>स्थानिक कार्यवाह |

**प्राचार्य डॉ. पंडित शेळके**

स्थानिक कार्याध्यक्ष

सर्व विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

मा. महोदय/ महोदया,

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, आमच्या महाविद्यालयात मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन दि. २५, २६ व २७ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित करीत आहोत. सदर अधिवेशनाला आपण सादर निमंत्रित आहात.

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य घेऊन स्व.बाबुरावजी घोलप व स्व.शारदाबाई पवार यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची ७ सप्टेंबर १९४१ रोजी स्थापना केली. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे व पुढील पिढी सक्षम घडविणे हा संस्था स्थापनेमागचा मूळ हेतू आहे.

स्व.बाबुरावजी घोलप यांना स्व.मामासाहेब मोहोळ, स्व.अण्णासाहेब आवटे, स्व. शंकरराव भेलके, स्व.अण्णासाहेब वाघीरे, स्व.शंकरराव उरसळ, स्व.मामासाहेब पिंपळे यांनी संस्था स्थापनेत मोलाचे सहकार्य केले. नंतरच्या काळात संस्थेच्या विकासात मा. अध्यक्ष मा. शिक्षणमंत्री स्व. प्रा. रामकृष्ण मोरे आणि मा. खा. अशोकराव मोहोळ यांनी योगदान दिले. सध्याचे संस्थेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या दैदिप्यमान मार्गदर्शनाखाली संस्थेची वेगाने प्रगती होत आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अंतर्गत मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळा - नर्सरी-१२, प्राथमिक-१२ आणि माध्यमिक शाळा-५५, उच्च माध्यमिक शाळा-२७, कनिष्ठ महाविद्यालये-०४, व्यावसायिक महाविद्यालये-२५, वरिष्ठ महाविद्यालये-०८ (कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालये) कार्यरत असून एक लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## महाविद्यालयाची माहिती

पुरंदर तालुक्यातील उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेऊन पुणे जिल्हा शिक्षण मंडळ स्व.बाबुरावजी घोलप स्व. मामासाहेब मोहोळ, स्व.अण्णासाहेब वाघीरे, स्व.शंकराव उरसळ, स्वातंत्र्यसैनिक स्व.भिकुतात्या जगताप, स्व. आप्पासाहेब लांडगे यांच्या प्रयत्नाने वाघीरे महाविद्यालयाची स्थापना सन १९७२ साली झाली. महाविद्यालयाने यशस्वीपणे सुवर्ण महोत्सवी टप्पा पूर्ण केला आहे. आमचे महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असून राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद NAAC बंगलोर द्वारा बी++ श्रेणी प्राप्त झालेली आहे.

महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. पदवीसाठी - बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.व्होक, बी.एस्सी.(संगणक शास्त्र), बी.बी.ए. सी.ए., व पदव्युत्तर स्तरावर- एम.ए- अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, एम.एस्सी. - रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र. संशोधन केंद्र. - इंग्रजी, वाणिज्य व रसायनशास्त्र. महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात ५००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## अर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग कार्यरत आहे. महाविद्यालयात पदवी स्तरावर सामान्य व विशेष स्तरावर व वाणिज्य विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषय शिकविला जातो. विभागाची उत्तम निकालाची परंपरा असून विभागातील विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळाले आहे. अर्थशास्त्र विभागाचे माजी विद्यार्थी अनेक चांगल्या पदावर कार्यरत आहेत. त्यापैकी डॉ. दिगंबर दुर्गाडे हे पुणे जिल्हा सहकारी बँक पुणे येथे अध्यक्षस्थान भूषवित आहेत. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. डी.एस. कदम हे याच महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत.

## ऐतिहासिक पुरंदर तालुका :

पुरंदर तालुक्याला ऐतेहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा (जेजुरी), श्री. संत सोपानकाका समाधी मंदिर, छत्रपती संभाजी महाराजांचे जन्मस्थान असणारा पुरंदर किल्ला व छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी म्हणून या तालुक्याची ओळख आहे. म.जोतीबा फुले यांचे जन्मगाव खानवडी याच तालुक्यात आहे. तसेच थोर साहित्यिक व स्वातंत्र्यसैनिक आचार्य प्र. के. अत्रे यांचे सासवड हे गाव.

### पुरंदर तालुक्यातील प्रसिद्ध ठिकाणे

**सासवड** – संत.सोपानदेव समाधी मंदिर, बाळाजी विश्वनाथ पेशवे समाधी, वीर बाजी पासलकर समाधी, आचार्य प्र. के. अत्रे जन्मस्थान, पेशवेकालीन पुरंदरे वाडा, पांडवकालीन वटेश्वर, संगमेश्वर व सिद्धेश्वर मंदिर, मस्तानी महाल

| | | |
|---|---|---|
| किल्ले पुरंदर | - वज्रगड छत्रपती संभाजी महाराज जन्मस्थान | (१२ किमी ) |
| जेजुरी | - कुलदैवत खंडोबा मंदिर, मूळस्थान कडेपठार | (१७ किमी ) |
| मोरगाव | - अष्टविनायक गणपती | (३४ किमी) |
| केतकावळे | - प्रति बालाजी मंदिर | (१७ किमी ) |
| नारायणपूर | - प्रसिद्ध दत्त मंदिर क्षेत्र | (९ किमी) |
| माळशिरस | - ऐतिहासिक पांडवकालीन भुलेश्वर मंदिर | (२० किमी) |
| बोपगाव | - कानिफनाथ मंदिर गड | (९ किमी) |
| कुंभारवळण | - सिंधुताई सपकाळ यांचे ममता बालसदन | (५ किमी) |
| खानवडी | - महात्मा ज्योतिबा फुले यांचे गाव | (८ किमी) |
| भिवडी | - क्रांतिकारक उमाजी नाईक यांचे जन्मगाव | (५ किमी) |
| पांडेश्वर | - पुरातन पांडवकालीन महादेव मंदिर | (३० किमी) |
| पिंगोरी | - घुबड पक्षी अधिवास केंद्र | |
| जाधववाडी | - ऐतिहासिक जाधवगढी | (६ किमी) |
| सोनोरी | - ऐतिहासिक मल्हारगड | (५ किमी ) |
| वडकी | - मस्तानी तलाव | (१४ किमी) |

## मराठी अर्थशास्त्र परिषदेसंबंधी :

मराठी अर्थशास्त्र परिषदेची स्थापना ९ जानेवारी १९७७ रोजी करण्यात आली. परिषदेमार्फत दरवर्षी वार्षिक अधिवेशनाचे आयोजन केले जाते. दोन अधिवेशनाच्या दरम्यान विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते जवळपास दोन हजार आजीव सभासद असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेचे महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात या राज्यात आजीव सभासद आहेत. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे मुख्य उद्देश मराठीतून शोध निबंधाचे लेखन व वाचन वाढावे. अर्थशास्त्राची मराठीतून दर्जेदार ग्रंथ व पुस्तके निर्माण व्हावीत हा आहे. शिवाय चालू घडामोडीबाबत विचार मंथन करून त्यातून समाजाला योग्य दिशा मिळावी ह्या दृष्टीने ह्या परिषदेच्या वतीने सातत्याने प्रयत्न करण्यात येतात.

### राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाविषयी

आतापर्यंत मराठी अर्थशास्त्र परिषदेची ४५ अधिवेशने संपन्न झाली आहेत. ४६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दिनांक २५, २६, आणि २७ नोव्हेंबर २०२३ रोजी सासवड येथे आयोजित करण्यात आले आहे. हे अधिवेशन मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. दिलीप अर्जुने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. पंडित शेळके आणि स्थानिक -कार्यवाह डॉ. विशाल पावसे आहेत. अधिवेशनात निबंध सादर करण्याकरीता व चर्चेसाठी पुढील विषय निश्चीत करण्यात आले आहेत.

१. मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण
२. केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती
३. महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र

## शोधनिबंधाविषयी :

वरील तीन विषयाचे शोधनिबंध आपणास मा. अध्यक्षांकडे पाठवता येतील. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत. २५ ऑक्टोबर, २०२३ ही शोधनिबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. शोधनिबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीतजास्त २००० शब्दात मांडावयाचे असून, शोध निबंधासोबत ३०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध युनिकोड या फॉन्टमध्ये PageMaker किंवा MS-Word या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ १४ असावी. शोधनिबंधाची मूळ वर्ड फाईल आणि पीडीएफ फाईल maparishad1977@gmail.com या मेलवर २५ ऑक्टोबर, २०२३ पूर्वी मेल करावी. मा. अध्यक्ष यांना फोन करुन मेल व्यवस्थित पोहोचल्याची खात्री करुन घेतल्यास अधिक सुलभ होईल. शोध निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सभासद असावा, शोध निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, ई-मेल, महाविद्यालय/विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. शोधनिबंध लेखकांनी आपले शोधनिबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

प्रा. डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने
'राही सदन' नेवासेकर नगर, मंठा रोड, जालना ४३१२०३
मो. : ९४२२२१९७२३ ई-मेल: maparishad1977@gmail.com

सर्व शोधनिबंध International Research Journal of Multidisciplinary Studies ( ISSN : 2454-8499 ) ( Referred double blind peer reviewed Journal ) या जर्नलमध्ये प्रकाशित केले जाणार आहेत.

### नोंदणी शुल्काविषयी :

महाराष्ट्रातील प्राध्यापक, पत्रकार, राजकीय नेते व विचारवंतांना या परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. परिषदेचे नोंदणी शुल्क पुढील प्रमाणे :

१) आजीव सदस्य व तात्पुरते सदस्य रू. १४००/-
२) विद्यार्थी व संशोधक - रु. ८००/-
३) सदस्यांसोबत येणारे नातेवाईक व चालक (ड्रायव्हर) रु.८००/-

परिषदेचे नोंदणी शुल्क खालील स्टेट बँकेच्या खात्यावर ऑनलाईन भरू शकता.

State Bank of India,
A/c Name - Principal, Waghire College Saswad
Account No. : 11655860062
IFSC Code : SBIN0001135
MICR : 411002077

ऑनलाईन शुल्क भरल्यानंतर कृपया खाली दिलेल्या लिंकद्वारे गुगल फॉर्म मध्ये माहिती भरावी. त्यामुळे सर्वांच्या निवासाचे सुयोग्य नियोजन सोपे जाईल.
गुगल फॉर्म नोंदणी लिंक - https://forms.gle/ZL3WRNa8sDZr7SCy8

### सासवड येथे येण्यासाठी –

हडपसर, पुणे किंवा कात्रज, पुणे
मार्गे येऊ शकतात. (अंतर २० कि.मी.)
कोल्हापूर व सातारा मार्गे येणाऱ्यांनी
कोपूरव्होळ – नारायणपूर मार्गे